# महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
## प्रशि. पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा) सत्र क्रमांक 111,
## अंतिम परिक्षा, जानेवारी - 2015

| | | | |
|---|---|---|---|
| पेपर क्रमांक | - 04 | एकुण गुण- | 100 |
| विषय | - स्थानिक व विशेष कायदे | वेळ - 1000 ते 1300 | |
| दिनांक | - 21/01/2015 | वार - बुधवार | |

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

**सूचना :**
अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहे.
क. वाचनीय अक्षरात उत्तरे लिहावी.
ड. फक्त निळया / काळया पेनचाच वापर करावा.
इ. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
ई. मोबाईल फोन / पुस्तके परिक्षा कक्षात आणण्यास मनाई आहे.
उ. परिक्षा सुरु असतांना कॉपी करतांना किंवा बोलतांना आढळून आल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
ऊ. पुरवणी उत्तरपत्रिकेवर नाव व रोल नंबर लिहू नये.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

**प्र.1 खालील परिच्छेद वाचून त्यावर आधारीत प्रश्नांची उत्तरे द्या.** गुण

अतुलने स्वतःच्या घरातील कॉम्प्युटरव्दारे ई-मेल अकाऊंट उघडले व त्याव्दारे मोहिनीला तिच्या ई-मेल आयडीवर अश्लील चित्रे व मेसेजेस पाठविले. त्यासंबंधाने मोहिनीने पोलीस सायबर सेलकडे तक्रार दिली. 10

[अ] सदर गुन्हयात कोणकोणती कलमे लागतील? 2

[ब] आरोपीला शोधण्यासाठी काय करणे आवश्यक आहे? 2

[क] जप्ती पंचनामा करतांना पंच कोणते घ्याल? काय जप्त कराल? 2

[ड] जप्त मुद्देमाल कोठे पाठवाल? त्यासंबंधाने कोणती प्रश्नावली तयार कराल? 2

[इ] सदरच्या गुन्हयात प्रथम दोषसिध्दीसाठी कोणती शिक्षा आहे? दुसऱ्या व नंतरच्या दोषसिध्दीसाठी किती शिक्षा आहे? 2

**प्र.2 खालील परिच्छेद वाचून त्यावर आधारीत प्रश्नांची उत्तरे द्या.** 10

गुप्त बातमीदाराच्या माहितीवरुन असे समजले आहे की, विलेपार्ले रेल्वे स्टेशनच्या बाहेरील साहील पान टपरीवर एका इसमाने अवैधरित्या विकण्यासाठी चार विदेशी बनावटीचे अग्निशस्त्र आणले आहे. सदर परिसर हा जुहू पोलीस स्टेशन अंतर्गत येत असून तुम्ही जुहू पोलीस स्टेशनला कार्यरत आहात. तुम्हालाच वरिष्ठांनी संपूर्ण कारवाईची जबाबदारी दिली असून तुम्ही आरोपीस सदर गुन्हयात सापळा रचून अटक केली आहे.

**तरी खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

[अ] सदर गुन्हयात कोणत्या कायद्यान्वये व कलमान्वये कारवाई कराल? आरोपीस शिक्षा लागल्यास शिक्षेची तरतूद काय? [30 शब्द] 2

[ब] पंचनाम्यात कोणकोणते महत्वाचे मुद्दे लिहीणे आवश्यक आहे? [50 शब्द] 4

[क] दोषारोप पत्र दाखल करण्यासाठी कोणाची परवानगी घ्यावी लागेल व कोणत्या कलमान्वये? [30 शब्द] 2

[ड] मुद्देमाल तपासण्यासाठी कोणत्या तज्ञाकडे पाठवाल व तुमची प्रश्नावली काय असेल? [30 शब्द] 2

प्र.3 खालील परिच्छेद वाचून त्यावर आधारीत प्रश्नांची उत्तरे द्या. 20

बांद्रा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना गुप्त बातमीदारांकडून खात्रीशीर बातमी कळली की, एस.व्ही. रोड वरील हिना ब्युटी पार्लर मध्ये मसाजच्या नावाखाली तेथील मालकीण बेबीबाई ही वेश्या व्यवसाय चालविते. त्यावरुन प्रभारी अधिकारी यांनी त्याठिकाणी सापळा रचून छापा टाकण्याचे ठरविले. पो.उप.नि. शिंदे यांचे सह एक छापा पथक तयार केले व कर्मचाऱ्यांमार्फत दोन प्रतिष्ठीत व्यक्तींना बोलावून घेतले. सदर इसमांनी पंच म्हणून काम करण्यास होकार दिल्यानंतर एका पंच नामे राजु गावीत यास बनावट गिऱ्हाईक बनवून त्यास लॉजचा पत्ता व मुलीचे पैसे देऊन सविस्तर पंचनामा केला. पंच राजु गावीत ठरल्याप्रमाणे हिना मसाज पार्लर येथे गेला. तेथे त्याने पार्लर मालकीन बेबीबाई हिचेकडे मुली बाबत मागणी केली. बेबीबाईने त्याला बबीता नावाच्या मुलीच्या बरोबर जाण्यास सांगितले. बेबीबाईच्या मागणीवरुन पंच राजू गावीत याने बेबीबाईला हजार रुपये दिले व तो मुलीला घेऊन रतन शेट्टी हयांच्या मालकीच्या वैभव लॉजवर गेला. सदर लॉज मध्ये स्वतःच्या नावाची नोंद केली व बबीता हीस बायको सांगुन रुम भाडयाचे हजार रुपये काऊंटरवर दिले. रुममध्ये जाताच पंच राजु गावीत याने बबीता हिच्या मागणीवरुन हजार रुपये दिले. दुसऱ्या पंचांच्या इशाऱ्यावरुन लॉज बाहेर असलेल्या पोलिसांनी छापा टाकला.

[अ] बांद्रा पोलीस स्टेशनला कोणत्या कायद्या व कलमाखाली गुन्हा दाखल केला जाईल? [30 शब्द] 2

[ब] पंचनामा करतांना तुम्ही पुराव्याच्या दृष्टीने कोणकोणती साहित्ये व साधने जप्त कराल? [50 शब्द] 4

[क] सदर ठिकाणी छापा टाकतांना कोणत्या दर्जाचे पोलीस अधिकारी आवश्यक आहे? त्याबाबतीत कायद्यामध्ये कोणत्या कलमान्वये तरतूद करण्यात आली आहे? [30 शब्द] 2

[ड] वैभव लॉजचे मालक रतन शेट्टी यांच्यावर आरोप ठेवता येईल का? असल्यास कोणत्या कायद्या व कलमान्वये? [50 शब्द] 4

[इ] सदर गुन्हयांमध्ये कमीत कमी व जास्तीत जास्त कोणत्या शिक्षेची तरतूद आहे? [30 शब्द] 2

[ई] हिना पार्लरची मालकीण बेबीबाई हिच्यावर कोणत्या कलमान्वये कारवाई करता येईल? [30 शब्द] 2

[उ] प्रस्तुत घटनेतील मुलगी बबीता हिचा अनैतिक देह व्यापार झाला असल्यास ती आरोपी होऊ शकते काय? त्याबाबतची तरतूद काय? [50 शब्द] 4

प्र.4 खालील परिच्छेद वाचून त्यावर आधारीत प्रश्नांची उत्तरे द्या. 10

सांताक्रुझ पोलीस ठाणे येथील पोलीस निरीक्षक प्रदिप शिंदे यांना गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, जॉन डी मेलो कोळीवाडा, सांताक्रुझ यांच्या राहत्या घरी भारत-पाकिस्तान 20-20 क्रिकेट मॅचवर सट्टा लावण्यात येत आहे. यावरुन पोलीस निरीक्षक प्रदिप शिंदे यांनी 2 प्रतिष्ठित पंचांना बोलावून कर्मचाऱ्यांसह जॉन डी मेलो यांच्या घरावर छापा टाकला असता त्यांच्या घरी 4 अठरा वर्षांवरील कॉलेजकुमार तसेच 6 वेगवेगळया नंबरचे मोबाईल, 1 मोठा स्क्रिनचा एल.सी.डी, 1रजिष्टर त्यामध्ये क्रिकेट प्लेअरची नावे, त्यांची धावसंख्या, पैज लावणाऱ्यांची नावे, त्यांचे पैसे व मोबाईल क्रमांक असे साहित्य मिळून आले.

[अ] सदर गुन्हयात कोणत्या कायद्यान्वये व कलमान्वये कारवाई होईल ? [30 शब्द] 2

[ब] जॉन डी. मेलोवर कोणत्या कलमान्वये कारवाई होईल? [30 शब्द] 2

[क] चारही कॉलेज कुमारांवर कारवाई होईल काय? कोणत्या कलमान्वये? [30 शब्द] 2

[ड] पंचनामा करतांना कोणकोणते साहित्य जप्त करावे लागतील? [30 शब्द] 2

[इ] बृहन्मुंबई मध्ये कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्याला जुगाराच्या अड्ड्यात, झडती घेण्याचे अधिकार दिले आहे? त्याची तरतूद कोणत्या कलमात आहे? फक्त कलम नमूद करावे. [30 शब्द] 2

**प्र.5 खालील प्रश्नांची उत्तरे द्या.** **10**

[अ] मोटार वाहन अधिनियम, 1988 अन्वये कोणत्या परिस्थितीत वॉरन्टाशिवाय अटक करण्याचे अधिकार दिले आहेत? त्याबाबतची तरतूद कोणत्या कलमात दिली आहे? [30 शब्द] *2*

[ब] मंगेशकडे वाहन चालविण्याचा परवाना नाही तरी तो वाहन चालवितो. त्यावर कोणत्या नियमान्वये व कलमान्वये कारवाई होईल? [30 शब्द] *2*

[क] औषधी द्रव्याचा अंमल असणाऱ्या व्यक्तीने किंवा दारु पिलेल्या व्यक्तीने वाहन चालविले किंवा चालविण्याचा प्रयत्न केला तर मोटार वाहन कायद्याच्या कोणत्या नियमान्वये व कलमान्वये शिक्षा होईल? पहिल्या अपराधासाठी काय शिक्षा होईल व पुन्हा तसाच अपराध 3 वर्षाच्या आत केला तर काय शिक्षा होईल? [30 शब्द] *2*

[ड] वाहन परवाना नोंदणी प्रमाणपत्र इ.दस्ताऐवज खोटे आहे असे तपासी अधिकाऱ्यास आढळले तर सदर दस्ताऐवज व इतर दस्ताऐवज कोणत्या कलमान्वये अडकवून ठेवण्याचा अधिकार आहे? [30 शब्द] *2*

**[इ] नोंदणी प्रमाणपत्र, परवाना ही कागदपत्र चालकाजवळ नसल्यास तुम्ही कोणती कारवाई कोणत्या कलमान्वये कराल? [30 शब्द]** *2*

**प्र.6 खालील प्रश्नांची उत्तरे द्या.** **06**

**[अ] रमेश याने गुंगीकारक औषध सेवन केले आहे, असे तपासी अधिकाऱ्यास आढळले. तपासी अधिकारी यांनी त्याची वैद्यकिय तपासणी केली असता रमेशने गुंगीकारक औषध सेवन केल्याचे निष्पन्न झाले आहे व त्याने कोकेन सेवन केल्याचे आढळले. तर रमेशवर कोणत्या कायद्यान्वये व कलमान्वये कारवाई होईल? शिक्षा काय होईल? [30 शब्द]** *2*

**[ब] संजय हा गुंगीकारक औषधांच्या व्यापारामध्ये सहभागी आहे हे माहित असतांनाही माधव याने संजयला आसरा दिला व अशा व्यापारासाठी अर्थसहाय्य दिले. तर माधव यास कोणत्या कलमान्वये काय शिक्षा होईल? [30 शब्द]** *2*

**[क] मोहन याला केंद्र शासनाने अफुची लागवड करण्यासाठी लायसन्स दिले आहे, त्याने उत्पादन केलेल्या अफुच्या काही उत्पादनाचा बेकायदेशीरपणे अपहार केला. तर मोहनला कोणत्या कलमान्वये किती शिक्षा होईल? [30 शब्द]** *2*

**प्र.7 खालील प्रश्नांची उत्तरे द्या.** **06**

**[अ] सावरगाव खेडयात बिगर अनुसूचित जाती जमाती मधील अ या व्यक्तीने क या अनुसुचित जमातीच्या व्यक्तीला साधी दुखापत करुन त्याच्या अंगावरील कपडे काढून नग्न धिंड काढली. हे कृत्य कोणत्या कायद्याखाली व कलमाखाली गुन्हा होतो? (उपकलम नमूद करावे). [30 शब्द]** *2*

**[ब] अनुसचित जातीच्या स्त्रीवर उद्देशपुर्वक तिची अप्रतिष्ठा करण्याच्या उद्देशाने तिच्यावर हमला केला. तर अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्याच्या कोणत्या कलमान्वये शिक्षा होईल? [30 शब्द]** *2*

**[क] अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीचे व्यक्तिला तिच्या जमिनीवरुन हुसकावून लावले तर कोणत्या कायद्यातील कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल होईल? [30 शब्द]** *2*

**प्र.8 खालील प्रश्नांची उत्तरे द्या.** **06**

**[अ] राज्य शासकिय माहिती अधिकाऱ्याने कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळण्याबाबतच्या अर्जास नकार दिला किंवा जाणूनबुजून चुकिची माहिती दिली तर कोणत्या कलमान्वये शिक्षा देण्यात येते? [30 शब्द]** *2*

[ब] माहितीचा अधिकार कायद्यामध्ये माहिती उघड करण्यापासून सुट कोणकोणत्या परिस्थितीत देण्यात आली आहे? सविस्तर तरतुदी लिहा. [50 शब्द] *4*